# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २७.०६.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) इमामवाडा पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २६.०६.२०२६ चे १७.४५ वा. ते १८.५० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे इमामवाडा येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना चारखंबा चौक, टिबी वार्डजवळील फुटबॉल ग्राऊंड येथून एक इसम संशयीतरित्या पायदळ जातांना दिसून आला. त्यास थांबवून त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राज मुकेश बक्सरे वय १९ वर्षे रा. सिरसपेठ, स्विपर कॉलनी, माता मंदीरजवळ, इमामवाडा, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचा दाट संशय आल्याने, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एका झिपलॉक पन्नीत एकुण ०६.४४ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीस अधिक विचारणा केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे आरीफ खान पठान वय ३० वर्ष रा. सिरसपेठ, नागपूर याचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एमडी पावडर कि. ६०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. जयवंत पाटील, सपोनि. अनिल कांबळे, पोउपनि. आदित्य मडावी, पोहवा. अमित पात्रे, पोअं. देवेंद्र भोंडे, अजय मिरासे व कैलास कोठुळे यांनी केली.



**२) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरुध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०६.२०२६ चे ०४.०५ वा. ते ०४.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर चे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत पोळा मैदान येथे एका घरी काही ईसम ताशपत्त्यांवर जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन, घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) मोहम्मद कासिम मोहम्मद रईस वय २८ वर्षे रा. कामगारनगर, कपीलनगर, नागपूर २) अभिषेक प्रविण मोहाडीकर वय २१ वर्षे रा. मोहम्मद नगर, कपीलनगर नागपुर ३) तुषार दिपक पराते वय २२ वर्षे रा. फुकटनगर, यशोधरानगर हे ताश पत्यांवर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. त्यांचे काही साथीदार पळून गेले. पळून गेलेल्या पाहिजे आरोपींचे नाव पत्ते विचारले असता, त्यांनी ४) कुणाल गडीकर वय अंदाजे २० वर्षे रा. फुकटनगर, यशोधरानगर, नागपूर ५) करण किशोर वाघाडे वय २० वर्षे रा. कावरापेठ, शांतीनगर, नागपूर असे सांगितले. तसेच घराबाबत विचारणा केली असता, घरमालक आरोपी क्र. ६) मनिष देवानंद पाठराबे वय २५ वर्षे रा. पोळा मैदान, बिनाकी मंगळवारी, यशोधरानगर याने घर उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन रोख ८,०००/—रू., ०५ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण ५८,०५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुस शेख, पोउपनि. निळकंठ नन्नावरे, पोहवा. प्रशांत कोडापे, पोअं. रामेश्वर गेडाम, राहुल इंगोले व राहुल राजगिरे यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत प्लॉट क्र. ३०, स्नेहदीप कॉलनी, हनुमान मंदीरसमोर, जरीपटका येथे राहणारे फिर्यादी स्नेहल उल्हास शेंडे वय ३६ वर्ष हे पंजाब नॅशनल बॅक, मुंबई येथे नेमणूकीस असल्याने ते मुंबई येथे हल्ली मुक्कामी असतात. त्यांचे वडील, पत्नी व मुले हे जरीपटका येथील घरी राहतात. फिर्यादीचे मुलांना सुटया असल्याने फिर्यादीची पत्नी, वडील व मुले हे आपले राहते घराला कुलुप लावुन फिर्यादी यांचेकडे मुंबई येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने दिनांक २२.०६.२०२६ चे ०२.५८ वा. ते ०३.१७ वा. चे दरम्यान, फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील रोख ५०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने आणि मोबाईल फोन असा एकुण किंमती ३,८२,२५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता फिर्यादी यांना दिसून आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. दशरथ पवार ८३९०४१४५२० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे इमामवाडा :—** कु. प्रिया कैलास जायसवाल वय १६ वर्षे रा. प्लॉट क्र. डी ११ ए, रेल्वे कॉलनी, मेन्स शाळेजवळ, इमामवाडा, नागपूर ही दिनांक १५.०६.२०२६ रोजी १६.०० ते १७.०० वा. चे

दरम्यान पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांब, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट १ इंच, केस–काळे व लांब, अंगात–जांभळा टि–शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेली आहे. भाषा– हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :–** कु. अनुष्का राजेश ठोंबरे वय १९ वर्षे रा. प्लॉट क्र. ८१, चिटणवीस नगर, नंदनवन, नागपूर ही दिनांक २४.०६.२०२६ रोजी १५.१५ वा. चे सुमारास पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ६ इंच, केस–काळे व लांब, अंगात–जांभळा टि–शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेली आहे. भाषा–मराठी/हिंदी बोलते. ओळखचिन्ह–डाव्या डोळयाखाली जुन्या माराचे निशान आहे.



कु. प्रिया



कु. अनुष्का

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**